महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १०/एनजीपी/मान्यता/AICTE/२०२२-२३/2249/877 दिनांक : 18 OCT 2022

प्रति,
प्राचार्य,
श्री यशवंतराव भोंसले एज्युकेशन सोसायटीचे,
यशवंतराव भोंसले पॉलिटेक्नीक,
पो. चऱ्हाटे (वझरवाडी), ता. सावंतवाडी,
जि. सिंधुदुर्ग-४१६५१०..

[3470]

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील विद्यमान कायम विनाअनुदानित व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये नवीन पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम, पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासनाने दिलेल्या परवानगीस अनुसरुन मान्यता देणेबाबत...

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : क्र. मान्यता-२०२२/(प्र.क्र.५८/२२)तांशि-५, दिनांक : १०.८.२०२२.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२२-२३पासून, आपल्या विद्यमान अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत खालील तक्त्यात दर्शविलेल्यानुसार नवीन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास व संस्थेत सुरु असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खालील तक्त्यात दर्शविलेल्यानुसार कायम विनाअनुदान तत्वावर प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास विहित अटींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | नवीन अभ्यासक्रमाचे नांव | अभ्यासक्रमाचा स्तर | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | मेकॉट्रॉनिक्स | पदविका | ३० |
| २. | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | पदविका | ६० ते ९० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून, आपल्या विद्यमान अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्यानुसार नवीन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याच्या अनुषंगाने मुदतठेव म्हणून रु. ३.०० लाख, खाते क्र. १४१०४५११०००९०७६, दिनांक : १२.८.२०२२ व विद्यमान अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत सुरु असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्यानुसार कायम विनाअनुदान तत्वावर प्रवेशक्षमतेत वाढ करण्याच्या अनुषंगाने मुदतठेव म्हणून रु. १.५० लाख, खाते क्र. १४१०४५११०००९०७५, दिनांक : १२.८.२०२२ अन्वये, बँक ऑफ

इंडिया, शाखा सावंतवाडी, येथे संस्था व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी ठेवलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीसह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून आपल्या विद्यमान अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत कायम विनाअनुदान तत्वावर उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्यानुसार नवीन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास व संस्थेत सुरु असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास, तसेच विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, मुंबई/ शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या प्राधिकरणामार्फत विहित करण्यात आलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था व संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करतील.
३. संस्थेने उपरोक्त नमूद अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तदअनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.
४. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने माहितीसाठी सादर.

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेशित :
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई.
४. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई.
५. निवड नस्ती.